# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक १२९) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.१५ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## घाटकोपर दुर्घटनेत मृतांची संख्या १४ वर

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- मुंबईत झालेल्या वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर येथील महाकाय लोखंडी जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळला. या दुर्घटनेत आतापर्यंत १४ जणांचा मृत्यू झाला आहे. १४० बाय १४० चौरस फुटांचा हा फलक क्षणार्धात कोसळल्याने जवळ असलेली वाहने आणि शंभरहून अधिक नागरिक त्याखाली सापडले. या दुर्घटनेत ७४ जण जखमी झाले आहेत. त्यामुळे एकूण पीडितांची संख्या ८८ झाली आहे. असे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले. पूर्व द्रुतगती मार्गावर छेडानगर परिसरात पेट्रोल पंपाजवळील फलक मुळाशी असलेले लोखंडी खांब मोडून जमिनीवर आदळला. या दुर्घटनेच्या ध्वनीचित्रफिती काही मिनिटांतच समाजमाध्यमांवर फिरू लागल्या. पाऊस पडत असल्यामुळे पेट्रोल पंपाच्या परिसरात अनेक वाहनचालक, पादचारी आडोशासाठी उभे होते. त्यांच्यावरच हा महाकाय फलक कोसळल्यामुळे अनेक जण गाडले गेले. हे दृश्य अतिशय भीषण होते. पोलीस, अग्निशमन दल, एनडीआरएफ, बीपीसीएल, महानगर गॅस आणि अदानी इलेक्ट्रिसिटी या प्राधिकरणांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. रात्री उशीरापर्यंत मदतकार्य सुरु होते. फलक लोखंडी असल्याने क्रेनशिवाय बाजूला करणे अथवा उचलणे शक्य नव्हते.

# नाशिकमध्ये ८०० कोटींचा भूसंपादन घोटाळा

## संजय राऊत यांचे मुख्यमंत्र्यांवर गंभीर आरोप; पंतप्रधानांना पाठवले पत्र

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नाशिकमध्ये ८०० कोटीचा भूसंपादन घोटाळा झाला असून त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या मर्जीतले बिल्डर ८०० कोटीचे लाभार्थी आहेत. या प्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्यावर काय कारवाई करणार? असा सवाल संजय राऊत यांनी केला आहे. तसेच संजय राऊत यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदीना याबाबत पत्र लिहिले आहे.

संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले. २०२०-२०२२ या काळात शहराच्या विकासासाठी आरक्षित भूसंपादनाची गरज आहे असा भास निर्माण केला आणि महापालिकेतील सत्ताधारी भाजपच्या मागणीनुसार राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने १७५ कोटी रुपये किमतीची भूसंपादनाची कारवाई करण्याची परवानगी दिली. यात महापालिकेचं आर्थिक हित जपलं जावं आणि जेवढी जमीन आवश्यक आहे तेवढीच जमिनीचं भूसंपादन करावी, अशा सूचना होत्या. पण नगरविकास खात्याचे तेव्हाचे मंत्री एकनाथ शिंदे होते. नगरविकास खात्याच्या या नेतृत्वाने नाशिकमधली जी आपली बिल्डर लॉबी आहे त्यांचा फायदा व्हावा म्हणून १५७ कोटी रुपयांची परवानगी असताना सुद्धा महापालिकेच्या प्रशासनाने तेथील भाजपचे पदाधिकारी



आणि आपल्या मर्जीतले बिल्डर यांच्या लाभासाठी ८०० कोटी रुपयांचे भूसंपादन केले.

आठशे कोटी रुपये ठराविक बिल्डरांच्या घशात घातले. जागा ताब्यात घेण्यासाठी शासनाने ठरवून दिलेले जे प्राधान्यक्रम होते त्या कोणत्याही नियमांचे पालन केले नाही आणि साधारण ८०० कोटी रुपये आपल्या मर्जीतल्या बिल्डरांना दिले. त्यातले काही बिल्डर मुख्यमंत्र्यांच्या व्यासपीठावर होते. त्यातले मुख्यमंत्र्यांच्या मांडीला मांडी लावून बसलेले ठक्कर नावाचे बिल्डर आहेत. काही बिल्डरांनी त्या काळामध्ये जमिनी विकत घेतल्या. शेतकरी नसतानाही जमिनी विकत घेतल्या आणि त्याच जमिनी एका महिन्यामध्ये पाचपटीने वाढवून त्या बिल्डरांनी महापालिकेकडून कोट्यवधी रुपये घेतले, अशी २७ प्रकरणे आहेत.

स्वतः छगन भुजबळ त्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून त्या संदर्भात माहिती दिली की, हे भूसंपादन अत्यंत बेकायदेशीर आणि त्यात मोठा आर्थिक घोटाळा आहे, तुम्ही या भूसंपादनाची चौकशी करा. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार ६४ प्रकरणांमध्ये कोट्यावधी रुपयांचे व्यवहार झालेले आहेत. अनेक बिल्डरांनी आपण शेतकरी असल्याचं दाखवलं, महापालिकेशी व्यवहार केला. त्यानंतर अनेक जमिनीचे न्यायालयामध्ये दावे सुरू आहे. ज्या जमिनी महापालिकेने घेतल्या त्यातल्या अनेक जमिनी ज्यांचे न्यायालयात दावे सुरू आहेत. एमआयडीसीतर्फे ज्या रस्त्याचे भूसंपादन आधीच झालेले आहे. त्या रस्त्यावरील जमिनीचा सुद्धा महापालिकेने साधारण पंचवीस कोटी रुपये मोजलेले आहेत.

ठक्कर बिल्डर यातला सर्वात मोठा लाभार्थी (पान ४ वर)

## महाविकास आघाडीला ३० ते ३५ जागा मिळणार; पृथ्वीराज चव्हाण यांचे भाकीत

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- अजित पवार गटाची लोकसभेची एकही जागा निवडून येणार नाही असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. तसेच राज्यात महाविकास आघाडीला ३० ते ३५ जागा मिळतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात देशासह महाराष्ट्रातील राजकीय समीकरणावर भाष्य केले आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय समीकरणाबद्दल बोलतांना त्यांनी अनेक मोठे दावे केले. ते म्हणाले, अजित पवार गटाची लोकसभेची एकही जागा निवडून येणार नाही. तर शिंदे गटाच्या तीन-चार जागा निवडून येण्याची शक्यता आहे. काँग्रेसला १२ जागांवर यश मिळू शकते. विशेषतः उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या बाजूने लोकांची सहानुभूती आहे. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडीला ३२ ते ३५ जागांवर विजय मिळू शकतो, असा अंदाज चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

याशिवाय यावेळी त्यांनी भाजपवर देखील टीका केली आहे. ते म्हणाले, विविध राज्यांमधून आढावा घेतल्यानंतर भाजपला पुन्हा सत्ता मिळणे अवघड असल्याचे दिसत आहे. देश आणि राज्यात भाजपविरोधी वातावरण दिसत आहे. परिणामी गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये सहजपणे सत्ता स्थापन करणाऱ्या भाजपला सध्या बहुमताचा २७२ चा आकडा गाठणेही अवघड दिसत आहे,असे म्हणत चव्हाण यांनी भाजपवर निशाणा साधला आहे.

## मोदींच्या डोक्यावर शिवरायांसारखा जिरेटोप

### राष्ट्रवादीच्या शरद पवार गटासह संभाजी ब्रिगेडची टीका

पुणे दि.१४ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसीतून तिसऱ्यांदा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या वेळी देशभरातील एनडीए मधील प्रमुख नेते उपस्थित होते. यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून प्रफुल्ल पटेल यांनी मोदींचा जिरेटोप देऊन सत्कार केला. मात्र, आता यावरुन शरदचंद्र पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांच्यावर टीका केली आहे. प्रफुल्ल पटेल लाज बाळगा, ''जिरेटोप'' आहे तो तुमच्या हातात अन् त्या बीभत्स माणसाच्या डोक्यावर शोभत नाही ! अशा शब्दात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पटेल यांच्यावर निशाणा साधला आहे.

या विषयी आपल्या पोस्टमध्ये प्रशांत जगताप म्हणाले की, प्रफुल्ल पटेल लाज बाळगा, ''जिरेटोप'' आहे तो तुमच्या हातात अन् त्या बीभत्स माणसाच्या डोक्यावर शोभत नाही ! रांझ्याच्या पाटलाचा चौरंग करणारे छत्रपती शिवाजी महाराज कुठे.... अन् मणिपूरच्या महिलांची नग्न धिंड निघाली तरी गप्प बसणारे, बलात्कारी रेवन्ना, ब्रिजभूषण यांना मांडीवर खेळवणारे, बिल्किस बानोच्या बलात्काऱ्यांना मुक्त सोडणारे ही बीभत्स बुध्दी कुठे असे त्यांनी म्हटले.

दरम्यान या प्रकरणी संभाजी ब्रिगेडकडूनही आक्षेप घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिरेटोप घातल्याने ते छत्रपती होऊ शकत नाहीत हा एक प्रकारे अवमान असल्याचे म्हणत उद्या जर मोदी रायगडावर गेले तर (पान ४ वर)

## धीरज वाधवान यांना सीबीआयकडून अटक

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- डीएचएफएल बँक गैरव्यवहार प्रकरणी धीरज वाधवान यांना सीबीआयने अटक केली आहे. त्यांच्यावर ३४ हजार कोटींचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. वाधवान यांच्या विरोधात सीबीआयने २०२२ मध्ये आरोपपत्र दाखल केलं होतं. या आधी ईडीकडून वाधवान यांना यस बँक गैरव्यवहार प्रकरणात अटक करण्यात आली होती. डीएचएफएल बँक गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय अन्वेषण ब्युरोने मोठी कारवाई केली आहे. सीबीआयने मंगळवारी धीरज वाधवान यांना ३४,००० कोटींच्या डीएचएफएल बँक घोटाळा प्रकरणी अटक केली.

## घाटकोपर दुर्घटना प्रकरणी ऑडिट करून अहवाल सार्वजनिक करा

### मुद्दा १० जूनला अधिवेशनात मांडणार-विजय वडेट्टीवार

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- घाटकोपर दुर्घटनेप्रकरणी सरकारला पंधरा दिवसांचा वेळ देणार आहे. ऑडिट करून अहवाल सार्वजनिक करावा असा इशारा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे. तसेच १० जूनला अधिवेशनात घाटकोपरचा हा मुद्दा मांडणार असल्याचेही देखील वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले आहे. विजय वडेट्टीवार यांनी आज दुर्घटनास्थळी भेट दिली. यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे.

विजय वडेट्टीवार यांनी बोलतांना संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, १० जूनपासून अधिवेशनात आम्ही हा मुद्दा लावून धरणार आहोत. त्यापूर्वी आता आम्ही सरकारला पंधरा दिवसांची मुदत पत्र लिहून देणार आहोत. याप्रकरणी ऑडिट केले पाहिजे. त्यानंतर अहवाल सार्वजनिक करायला पाहिजे. याशिवाय याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

पुढे वडेट्टीवार यांनी महापालिका प्रशासनाला याप्रकरणी जबाबदार धरले आहे. ते म्हणाले, घडलेल्या घाईची जबाबदारी बीएमसीची आहे. मृतांच्या नेटवाईकांना केवळ पाच लाखांची मदत जाहीर केली म्हणून होत नाही. याप्रकरणी चौकशी झाली पाहिजे. चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई देखील झाली पाहिजे. जागा कोणाचीही असली तर होर्डिंगसाठी परवानगी महानगरपालिकेकडून दिली जाते. त्यामुळे चौकशी करून अहवाल सार्वजनिक केला पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

तसेच वडेट्टीवार यांनी सध्या चंदा दो धंदा लो असे काम सुरू असल्याची टीका केली आहे. ते म्हणाले, सध्या चंदा दो धंदा लो असे काम सुरू आहे. त्यामुळे अनेक निष्पाप लोकांना आपला जीव गमवा लागला आहे. याप्रकरणाची चौकशी होत असताना वेळकाढूपणा केला जाऊ नये. ठाण्यासह पुण्यात देखील अनेक अनधिकृत होर्डिंग्स आहेत. आता घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

## सत्ताधाऱ्यांकडून राज्यात २ हजार कोटींचे वाटप; आमदार रोहित पवारांचा गंभीर आरोप

नाशिक दि.१४ (प्रतिनिधी)- यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपसह सत्ताधारी गटाच्या पक्षांकडून पैशाचे अमाप वाटप होत असून नेते, गुंड आणि मते विकत घेण्यासाठी त्यांनी आतापर्यंत २ हजार कोटी खर्च करत आहेत. तर गत अडीच वर्षात राज्य शासनाने तब्बल २५ हजार कोटींचे घोटाळे केले असून आमची सत्ता आल्यानंतर त्या सगळ्या पैशांची चौकशी करण्यात येणार आहे. पैसे वाटपासाठी सत्ताधाऱ्यांनी हेलिकॉप्टरच नव्हे, वाय आणि झेड सिक्युरिटीतल्या गाड्या, टँकर्स तसेच अॅम्ब्युलन्सचादेखील वापर केला असल्याचा दावा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे युवा नेते आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला. नाशिक दौऱ्यावर आलेल्या आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी (दि. १४) पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी बोलताना पवार यांनी मतदार मात्र अशा प्रकाराला मतदानातूनच उत्तर देणार असल्याचे सांगितले. राज्यात महाविकास आघाडीचा जोर असून महायुतीला केवळ १८ जागा मिळतील. त्यात भाजपला १३, शिंदे गटाला ३, तर अजित पवार गटाला एकही जागा मिळणार नसल्याचा दावादेखील पवार यांनी केला. अनेक ठिकाणी 'इव्हीएम' बंद, मशीन चेकिंगसाठी लावलेले सीसीटीव्ही बंद असे प्रकार झाले आहेत.

## विधान परिषदेची १० जूनला होणारी निवडणूक पुढे ढकलली

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- राज्यात सध्या लोकसभा निवडणुकीतील पहिला चार टप्प्यातील मतदान पूर्ण झाले आहे. तर आणखी एका टप्प्यात मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्य विधान परिषदेच्या चार जागांसाठी देखील निवडणूक जाहीर झाली होती. मुंबई, नाशिक आणि कोकण विभागात ही निवडणूक होणार होती. यामध्ये मुंबई आणि कोकण पदवीधर मतदारसंघाचा तर मुंबई आणि नाशिक शिक्षक मतदार संघाचा समावेश होता. या चारही मतदारसंघातील आमदारांचा कार्यकाळ ७ जुलै रोजी संपणार आहे. त्यामुळे याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. मात्र, आता या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

सध्या शाळांना सुट्टी असल्याने या निवडणुकीवर परिणाम होईल, अशी शंका अनेक शिक्षक संघटनांनी व्यक्त केली होती. त्यामुळे या निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार निवडणूक आयोगाने या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी १० जून रोजी मतदान होणार होते. यामध्ये चार जागांचा समावेश होता. विधान परिषदेमध्ये असलेल्या एकूण सदस्यांपैकी ७ सदस्य हे शिक्षक मतदार संघातील तर ७ सदस्य हे पदवीधर मतदारसंघातून निवडून येतात. यातील दोन पदवीधर मतदारसंघातील आणि दोन शिक्षक मतदार संघातील आमदारांचा कार्यकाळ ७ जुलै रोजी संपत आहे. त्यामुळे या चार जागांसाठी निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. या जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दहा जून रोजी राज्यात मतदान होणार असून १३ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार होती.

## घाऊक महागाई १३ महिन्यांतील उच्चांक गाठला

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- एप्रिल महिन्यात घाऊक महागाई १.२६ टक्क्यांवर पोहचली आहे. महागाईचा हा १३ महिन्यांचा उच्चांक आहे. यापूर्वी मार्च २०२३ मध्ये घाऊक महागाई दर १.३४% होता. खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्याने महागाई वाढली आहे. तर एक महिना आधी मार्च २०२४ मध्ये तो ०.५३ टक्के होता. तर घाऊक महागाई फेब्रुवारीमध्ये ०.२०% आणि जानेवारीत ०.२७% होती. यापूर्वी एप्रिलमध्ये किरकोळ महागाई दर ११ महिन्यांतील सर्वात कमी होता.

## पवार साहेबांनी सुप्रिया सुळे सोडून नेहमी इतरांना संधी दिली-जयंत पाटील

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- पुत्रीप्रेम तर आम्हाला अनुभवायला मिळाले नाही. कारण पुत्री खासदार असतानाही त्यांना कधी मंत्री केले नाही. त्यांच्या तीन टर्म खासदारकीच्या झाल्या. जेव्हा संधी होती तेव्हा शरद पवार साहेबांनी सुप्रिया सुळे यांना सोडून दुसऱ्यांना संधी दिली. त्यामुळे पुत्रीप्रेमाचा आरोप होण्याचा प्रश्नच नाही. आमच्या मंत्रिमंडळात आम्ही आदित्य ठाकरे यांना काम करताना पाहिले आहे. आदित्य मंत्री म्हणून काम करताना उद्धव ठाकरे हे कलेक्टिव्ह डिसिजन घ्यायचे. त्यावेळी आदित्य



ठाकरे हे चर्चेत आणि निर्णयात कधीच सहभागी नसायचे. त्यामुळे पुत्रप्रेम आणि पुत्रीप्रेम हा आरोप खोटा आहे, असे उत्तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना दिले. (पान ४ वर)

## तिहार तुरुंगात बॉम्ब हल्ल्याची धमकी; ईमेल पाठवणाऱ्याचा शोध सुरु

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- दिल्लीतील शाळा, विमानतळ आणि रुग्णालयानंतर आता तिहार तुरुंगात बॉम्बस्फोट करण्याची धमकी देण्यात आली आहे. आज (मंगळवारी) ईमेलद्वारे तुरुंग प्रशासनाला ही धमकी प्राप्त झाली. याप्रकरणी दिल्ली पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. तसेच ईमेल पाठवणाऱ्याचा शोध घेतला जात आहे. याबरोबरच याठिकाणी बॉम्ब स्क्वॉडदेखील तैनात करण्यात आल्याची माहिती आहे.

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, बॉम्बस्फोट करण्याची धमकी देणारा एक ईमेल आज तिहार तुरुंग प्रशासनाला प्राप्त झाला होता. त्यानंतर तिहार तुरुंग प्रशासनाने याची माहिती दिल्ली पोलिसांना दिली. दिल्ली पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत घटनेचा तपास सुरू केला. तिहार तुरुंगात सध्या हाय प्रोफाईल प्रकरणातील आरोपीना ठेवण्यात आलं आहे. यामध्ये काही राजकीय नेत्यांचादेखील समावेश आहे.

विशेष म्हणजे अशाच प्रकारच्या धमकीचा ईमेल सोमवारी दिल्लीतील काही रुग्णालयांना प्राप्त झाला होता. यामध्ये जीटीबी रुग्णालय, दादा देव रुग्णालय, हेडगेवार रुग्णालय आणि दीप चंद्र बंधू रुग्णालय या महत्त्वाच्या रुग्णालयांचा समावेश आहे. दरम्यान, काल धमकी ईमेल मिळताच दिल्ली पोलिसांनी या रुग्णालयात दाखल होत तपास केला. मात्र, त्यांना संशयास्पद अशी कोणतीही वस्तू आढळून आली नाही.

## गडचिरोलीत कमांडरसह तीन नक्षलवाद्यांचा खात्मा

गडचिरोली दि.१४ (प्रतिनिधी)- गडचिरोली पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत तीन नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना यश आले आहे. मृतांमध्ये १६ लाखांचे बक्षीस शिरावर असलेला पेरमिली दलमचा एलओएस कमांडर तथा विभागीय समिती सदस्य बस्तर निवासी वासू याच्यासह दोन महिला नक्षलींचा समावेश आहे. भामरागड तालुक्यातील कतरनगट्टा येथील जंगल परिसरात पहाटेच्या सुमारास ही चकमक उडाली होती. गेल्या ४ महिन्यांमध्ये महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर १३० नक्षल्यांना कंठस्नान घालण्यात आले.

पेरमिली दलमचे नक्षली कतरनगट्टा येथील जंगल परिसरात आपला कॅम्प लावून पोलिसांना टार्गेट करण्याच्या दृष्टीने बसले होते. ही माहिती प्राप्त होताच अतिरिक्त पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सी-६० या नक्षलविरोधी पथकाचे जवान शोध अभियानावर निघाले. अभियानादरम्यान पोलिसांच्या पथकाची चाहूल लागताच कॅम्प मधील नक्षलवाद्यांनी पोलिस पथकावर गोळीबार सुरू केला.

पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात दोन महिलांसह एक पुरुष असे एकूण तीन नक्षलवादी मृत्युमुखी पडले असल्याचे आढळून आले. घनदाट जंगलाचा फायदा घेऊन इतर नक्षलवादी पळून जाण्यात यशस्वी झाले, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक नीलोत्पल बसू यांनी दिली.

## मराठ्यांमुळे मोदी गोधड्या टाकूनच महाराष्ट्रात, जरांगेंचा हल्लाबोल

मुंबई दि.१४ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा ४ जून पासून आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. मनोज जरांगे पाटील यांची ८ जून रोजी नारायण गडावर सभा होणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून ते सगेसोयरेची मागणी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील करत असल्याचे सांगितले जात आहे. या वेळी मनोज जरांगे पाटील यांनी भाजपवर देखील निशाणा साधला. मराठ्यांमुळे मोदींना महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सभा घ्याव्या लागल्या. त्यामुळेच मोदी गोधड्या टाकूनच महाराष्ट्रात होते. मोदींवर ही वेळ फडणवीस आणि त्यांच्या चार-पाच लोकांमुळे आली असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

भारतीय जनता पक्षाच्या विरोधात आम्ही नाही. मात्र, जोपर्यंत सगेसोयरे आणि ओबीसी मराठा एकच असल्याचा अध्यादेश निघत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर तसा निर्णय झाला नाही तर येणारी विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे देखील मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही राजकारणात पडणार नसल्याचे देखील मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

देशात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत आम्ही कोणाचाही प्रचार केला नाही. किंवा कोणालाही निवडून आणा, असे म्हणालेलो नाही, असे देखील मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. आमचा महाविकास आघाडीला किंवा महायुतीला पाठिंबा नव्हता. मात्र, मी समाजाला कोणाला पाडायचे ते पाडा असे, म्हणालो होतो. त्यामुळे कोणाला पाडायचे हे समाजाला कळाले होते, असे देखील मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# वृद्धाश्रम ही आजच्या काळाची गरज

विभक्त कुटुंब पद्धती आणि बदलणारा काळ यामुळे वृद्धाश्रम ही काळाची गरज बनली आहे. ज्येष्ठांनीही ती स्वीकारली आहे. या पुढच्या काळात वृद्धाश्रमात राहणाऱ्या ज्येष्ठांची संख्या वाढत जाणार असेल, तर अशा वेळी 'वृद्धाश्रम'च वृद्धांसाठी सुखावह ठरतील हे निश्चित आहे. ही गरज का निर्माण होते? याचा विचार अगदी तरुण, मध्यमवयीन, वृद्ध, अतिवृद्ध प्रत्येकानेच केला पाहिजे.

ही दिवसांपूर्वी एका मैत्रिणीचा मेसेज आला. तिने लिहिले होते की, 'आपले राम गुरुजी काल गेले?' ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला. कारण विचारलं असता, तिने सर्व हकिकत सांगितली. आम्हाला घडविणारे राम गुरुजी सहा फूट उंच, गोरेपान, पांढरे शुभ्र कपडे घालणारे, ज्यांनी आमच्या गावातील अनेक पिढ्या घडविल्या. असे आमचे सात्त्विक विचारांचे गुरुजीष्ठ तिचं बोलणं ऐकून निशब्द झाले. ती म्हणाली, 'गुरुजींनी शेताच्या बांधावर जाऊन, स्वतःला पेटवून घेतले.' हे ऐकून मी अधिकच अस्वस्थ झाले. असं काय घडलं? की ज्यामुळे गुरुजींना आत्महत्या करावी लागली? हे विचारल्यानंतर ती म्हणाली की, 'त्यांच्या छोट्या मुलाने त्यांचा अतिशय छळ केला. मोठ्या मुलाने त्यांच्याशी संबंध ठेवले नव्हते. तीन सुशिक्षित मुली त्याही त्यांच्या घरी इतक्या व्यस्त झाल्या होत्या की, त्यांना आपल्या वडिलांकडे लक्ष द्यायलाही वेळ मिळाला नाही आणि मोठा मुलगा आणि त्याची बायको कित्येक वर्षांपासून गुरुजींच्या संपर्कातच नव्हते.

किती भयानक आहे हे. मुलांना मोठं करण्यासाठी, त्यांना घडविण्यासाठी, मुलींची लग्न करण्यासाठी बाप रात्रं-दिवस कष्ट करतो, झिजतो. स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्न बाजूला ठेवून मुलांच्या सुखाची स्वप्न पाहतो आणि मुलं बाप वृद्ध झाल्यानंतर अशा पद्धतीने कसे वागू शकतात? त्यांच्या वेळेला वाटलं, त्यांना पेन्शन येत होती. कोणाच्या तरी मदतीने एखाद्या अनाथ आश्रमात का जाऊन राहिले नाहीत ते?

त्यानंतर अनेक वेळा वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या वृद्धाश्रमाला भेटी दिल्या. जेव्हा केव्हा तिथे जाते, तेव्हा वृद्धाश्रमांमध्ये वृद्धांसाठी केलेल्या सोयी-सुविधा पाहून बरंही वाटतं; परंतु त्या वृद्धांची जेव्हा सुसंवाद साधते, तेव्हा त्यांच्या मनामध्ये चाललेली खळबळ प्रकर्षाने जाणवते. आयुष्यभर आपण ज्या घरामध्ये राहिलेलो असतो, तिथले आजूबाजूचे लोकं, तो परिसर या गोष्टी ते कधीच विसरत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या मुलांसाठी आपण आयुष्यभर कष्ट केले आणि त्यांनीच असं आपल्याला वाऱ्यावर सोडलं, याची खंतही त्यांच्या मनात कायम राहते; परंतु माणसाला कुठे ना कुठे तडजोड करावीच लागते. काहींनी सांगितलं आता काम होत नाही. एकटं घरात राहण्यापेक्षा इथे आमच्या वयाची चार माणसं भेटतात, गप्पा होतात, घरात बोलायला कोणालाच आमच्याशी वेळ नसतो, म्हणून इथं बरं वाटतं. काहींनी सांगितलं, मूल परदेशी गेले आणि तिकडचेच झाले. काही म्हणाले, आमचे जोडीदार आम्हाला सोडून गेले. एकटं घरात राहताना घर खायला उठतं. म्हणून होती तेवढी जमापुंजी, पेन्शन अनाथ आश्रमाला देतो आणि इथे राहतो. एका आजीने सांगितलं, मला हृदयाचा प्रॉब्लेम आहे. घरात मरून पडले, तरी चार दिवस कोणाला पत्ता लागणार नाही. दोन मुली आहेत, त्या सासरी गेल्या. त्यामुळे माझं कोण पाहणार? म्हणून मुलीनेच सल्ला दिला, वृद्धाश्रमात राहण्याचा आणि मी इथे आले. मी या सर्वांबरोबर खूश राहण्याचा खूप प्रयत्न करते; परंतु माझ्या घराची मला खूप आठवण येते.

खरं तर आता वृद्धाश्रम ही काळाची गरज झाली आहे. बदलत्या काळाबरोबर आपणही बदलायला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला हे कळायला पाहिजे की, मुलं आपली म्हातारपणाची काठी असतील की नाही माहीत नाही; परंतु आपल्याकडे असलेला पैसाच आपल्याला वृद्धापकाळात उपयोगी येऊ शकतो. कारण आश्रमात राहण्यासाठीही पैसे लागतात. ही सोय आपण जेव्हा कमवत असतो, तेव्हापासूनच करून ठेवायला पाहिजे.? आपण जे कमावत आहोत, त्यातील दहा टक्के तरी आपल्यासाठी वेगळे ठेवायला पाहिजेत. पैसे साठले की, त्याची 'एफडी' करून बँकेत ठेवली, तर त्याचे व्याजही येईल आणि जेव्हा आपल्याला गरज पडेल, तेव्हा ते आपल्याला उपयोगी येतील. याचा आता सर्वांनी विचार करण्याची वेळ आली आहे; परंतु समाजामध्ये असे अनेक लोक आहेत, जे रोजी-रोटी कमवून आपला उदरनिर्वाह करतात. वृद्धापकाळामध्ये त्यांनी कुठे जावे? अशांसाठी सरकारने कमीत कमी तालुक्याच्या ठिकाणी तरी मोफत वृद्धाश्रमाची सोय करायला हवी.

आम्ही लहान असताना घरातल्या वृद्धांची सेवा करणे, हा संस्कार मानला जात असे. त्यामुळे घरातले सर्वच वृद्धांचा मान ठेवायचे. त्यांचं आजारपण आनंदाने करायचे; परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. समाजासाठी काही करावसं वाटत असेल, तर वृद्धाश्रमाला मदत करावी. होतकरू लोकांनी पुढे येऊन, अनाथ आश्रम उभे करावेत, असे मला वाटते.

काही दिवसांपूर्वी पालघर येथे 'सरोद फाऊंडेशन'चा कार्यक्रम होता. त्यांनी आनंद वृद्धाश्रमाच्या मनीषा कोटक यांची मुलाखत घेतली होती. त्यावेळेला आनंद वृद्धाश्रमाच्या संचालिका मनीषा कोटक यांच्याशी सुसंवाद साधताना, तिथे राहत असलेल्या वृद्धांची माहिती मिळाली. ती ऐकून मनाला वेदना झाल्याष्ठ त्या म्हणाल्या, 'आमच्याकडे जे सीनियर सिटिजन आहेत. त्यांना आम्ही आई-बाबा असं संबोधतो, हे माझ्या नवऱ्याचं स्वप्न होतं. मुले एकदा सोडून जातात आणि परत आई-बाबांना पाहण्यासाठी, त्यांना भेटण्यासाठी फार कमी मुलं येतात. इथे असेही वृद्ध आहेत, त्यांची मुलं एका महिन्याचे पैसे भरतात आणि नंतर गायब होतात. जर कोणी सीरियस झालं, तर फोन केला, तर फोन उचलतही नाहीत आणि जर उचलला तर म्हणतात, दवाखान्यात नेऊन ॲडमिट करा. जर काही पैसे लागले तर सांगा. किती भयंकर आहे, हे सगळं. जे आई-वडील मुलांना जन्म देतात, वाढवतात शिक्षण शिकवतात आणि हे सर्व करताना आपल्या इच्छा-आकांक्षा याचाही विचार करत नाहीत. मुलीचे लग्न करताना वेळेप्रसंगी कर्ज काढतात, घर गहाण ठेवतात. मुलीचं लग्न करून सासरी पाठवतात आणि मुली सासरी गेल्या की, आपली जबाबदारी संपली अशाच वागतात. सध्याची पिढी स्वतःपुरचा विचार करणारी अशी आहे. आई-वडिलांचे वय झाले की, त्यांना ती अडगळ वाटायला लागते.'

# आहाराचे भयंकर षडयंत्र....

**या** पाश्चात्त्यांची आहारासंबंधीची मते हरघडी बदलत असतात, त्यांच्या सल्ल्यावर, आहारावर विश्वास ठेवायचा कसा?

भारतीयांना अजिबात गरज नाहि या विदेशी खाद्यपदार्थ व फळ भाज्यांची. जाणीवपूर्वक कंपन्या यांचा धडाक्यात प्रचार करत आहेत व बरेच भारतीय या कंपन्याची दलाली करत आहेत ...

### वेळीच सावध व्हा अशा षडयंत्रा पासून

अनेक वर्षे बदामाचा ढोल पिटल्यानंतर आता हळूच सांगितले जात आहे की, 'बदाम खा, पण फक्त कॅलिफोर्नियाचे.' असे काय पोषण या बदामांतून मिळत- जे आपल्याकडच्या बदामांमधून मिळत नाही? बदामांतून मिळणाऱ्या रक्तवर्धक लोहाचे प्रमाण आहे ५.०९ मि. ग्रॅ.! तर आपल्याला सहज उपलब्ध असणाऱ्या तीळांतून त्याहून अधिक म्हणजे ९.३ मि. ग्रॅ. आणि हळिवांमधून तर तब्बल १०० मि. ग्रॅ. लोह मिळते.

बदामाइतकीच अत्यावश्यक मेदाम्ले कलीगडाच्या बियांमधून मिळतात. तीळांतून तर ती अधिक संतुलित स्वरूपात मिळतात. शेंगदाण्यांमधून- ३.९० मि. ग्रॅ. आणि तीळांतून तर १२.२० मि. ग्रॅ.! हाडांना पोषक कॅल्शियम बदामांमधून मिळते २३० मि. ग्रॅ., तर तीळांमधून तब्बल १४५० मि. ग्रॅ.! महत्त्वाचं म्हणजे १०० ग्रॅम तीळ दिवसभरातून खाता येतील, पण १०० ग्रॅम बदाम खाणार कसे? आणि खाल्ले तरी पचवणार कसे? तरीही प्रत्येकाने 'मूठभर बदाम खा!' असे जाहिरातींमधून सांगितले जाते. मग ते तुम्हाला पचोत वा बाधोत!

### ॲन ॲपल अ डे कीप्स द डॉक्टर अवे

हेच सफरचंदाबाबतही! प्रचारामध्ये किवी आणि सफरचंदामधून मिळणाऱ्या 'क' जीवनसत्त्वाच्या अलौकिक गुणांचे वर्णन केले जाते; जे बऱ्याच अंशी खरे आहे. मात्र, प्रत्यक्षात या फळांमधून 'क' जीवनसत्त्व (Vitamin C) किती मिळते? सफरचंदामधून मिळते केवळ एक मि. ग्रॅ.! परदेशी सफरचंदामधून जरा बरे म्हणजे दहा मि. ग्रॅ.! तर किवीमधून मिळते ६३.९६ मि. ग्रॅ. इतके.

त्या तुलनेत आपल्याला सहज उपलब्ध असणाऱ्या भारतीय फळांमधून कितीतरी अधिक 'क' जीवनसत्त्व मिळते. जसे- चिंच १०८ मि. ग्रॅ., काजू फळ १८० मि. ग्रॅ., पेरू २१२ मि. ग्रॅ. आणि आवळा तब्बल ६०० मि. ग्रॅ.! रक्तवर्धक लोह, रक्तवाहिन्या व चेतातंतूंना पोषक मॅग्नेशियम, स्नायूंना (पर्यायाने हृदयस्नायूंना) पोषक पोटॅशिअम, रोगप्रतिकारशक्तिवर्धक आणि प्रजननक्षमतासंवर्धक जस्त वगैरे अनेक पोषक घटकांची एतद्देशीय फळांशी तुलना करता किवी व परदेशी सफरचंद भारतीय फळांसमोर उभेसुद्धा राहू शकत नाहीत.

### ब्रोकोलीमधून काय मिळते?

ब्रोकोलीमधून आपल्या आरोग्याला उपकारक असे काय मिळते- जे आपल्या भाज्यांमधून मिळत नाही? कोथिंबीर (४८०० मायक्रो ग्रॅम), अळू-पान (५९२० मायक्रो ग्रॅम) आणि माठ (८३४० मायक्रो ग्रॅम) यांच्याहून पावपटीपेक्षाही कमी (६२३ मायक्रो ग्रॅम) बीटा-कॅरोटिन ब्रोकोलीमधून मिळते. रक्तनिर्मितीमध्ये आवश्यक फॉलिक ॲसिड ब्रोकोलीपेक्षा (६३ मायक्रो ग्रॅम) कितीतरी अधिक पालक, माठ व टाकळ्यामधून मिळते.

विविध जीवनसत्त्वे आणि लोह, जस्त आदी खनिजे, प्रथिने आदी सर्वच पोषक घटक पुरविण्यात ब्रोकोली भारतीय भाज्यांपेक्षा बरीच कमजोर आहे. मग लोक का खरेदी करतात ब्रोकोली? ५६ हून अधिक प्रकारच्या पालेभाज्या आणि ४४ हून अधिक प्रकारच्या फूल-फळभाज्या ज्या भारतात पिकतात, तिथल्या लोकांनी परकीय भूमीत उगवणारी, खुडल्यानंतर बर्फात साठवलेली आणि कोणतेही विशेष पोषणमूल्य न देणारी ब्रोकोलीसारखी भाजी का खावी?

### भारतीयांना ओट्सची गरजच काय?

ओट्ससारखे अमेरिकेमध्ये घोडे व डुकरांचा खुराक म्हणून वापरले जाणारे धान्य कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी उपयुक्त म्हणून खाण्याचा सल्ला दिला जातो. पण मुळात जिथे कोलेस्टेरॉलचा रक्तवाहिनी चिंचोळी होण्याशी आणि पर्यायाने हार्ट अटॅकशी संबंध शंकास्पद आहे, तिथे ओट्स का खायचे? ज्या देशात तांदूळ, ज्वारी, बाजरी, नाचणी, गहू, जव पिकतात, त्यांनी आपल्या मातीत न पिकणारे धान्य का म्हणून खायचे? महत्त्वाचे म्हणजे ओट्समधून आपल्याकडील या धान्यांपेक्षा फार पोषक तत्त्वे मिळतात असंही नाही. ओट्सपेक्षा (३६१) अधिक आरोग्यदायी उष्मांक बाजरीतून (३८९) मिळतात. ओट्सहून (११) अधिक चोथा बाजरीमधून (११.३) मिळतो. भारतीयांना अत्यावश्यक असणारी कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह आदी तत्त्वे ओट्सहून जास्त बाजरी किंवा नाचणीमधून मिळतात.

तांदळामुळे नव्हे, तर रिफाइण्ड तांदळामुळे भारतीय स्थूल होत आहेत. जे पुरवणारा अन्नपदार्थ म्हणजे आपला वरण-भात. महत्त्वाचे म्हणजे वरण-भात, दाल-रोटी, भाजी-भाकरी, दोसा-सांभार खाताना तुम्ही डाळी, भाज्या, औषधी व पाचक मसाले यांसोबत ते धान्य खाता आणि तेही संपूर्णतः नैसर्गिक स्वरूपात.

याउलट, ओट्समधून मिळणारे पोषण एकांगी असते. ओट्स आपल्यासमोर येतात तेव्हा तो विविध कृत्रिम प्रक्रिया केलेला एक पदार्थ असतो; ज्यातून साखर, मीठ, प्रिझर्व्हेटिव्हज्सुद्धा आपल्या पोटात जातात. जे विविध आजारांना आमंत्रण देऊ शकतात. आपण नाचणी, बाजरी अशा देशी धान्यांचे सेवन वाढवले तर त्यांचा खपही वाढेल आणि त्यांचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात आपला थोडा हातभार लागेल. ओट्स खाऊन अमेरिकेची भर करण्यापेक्षा हे कधीही चांगलेच. नाही का?

### गुण सांगता.. दोषांचे काय?

याशिवाय अतिशय महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ओट्स, सीरियल्स, ऑलिव्ह तेल, किवी आदी पदार्थांचे गुण काय आहेत, याचा बराच गवगवा केला जातो. परंतु त्यांचे दोष काय, हे कधीच सांगितले जात नाही. सफरचंदाने होणारा मलावरोध आणि मलावरोधजन्य विकृती, शरीरात वाढणारे शीतत्व व शीतत्वजन्य विकार, किवीच्या आंबटपणामुळे होणारे घशाचे विकार, ओट्समुळे मंदावणारी आतड्याची पुरःसरण गती, पचनाचे विकार व मलावरोध, ओट्समधील फायटिक ॲसिडमुळे आतड्यांमधून कॅल्शिअम, जस्त व लोहाच्या शोषणामध्ये येणारा अडथळा, ब्रेकफास्ट सीरियल्समुळे स्थूलत्व आणि स्थूलत्वजन्य अनेक विकृतींचा धोका, शरीरात वाढणारा कोरडेपणा व रूक्षत्वजन्य विकृती, बदामामुळे होणारी कठीण मलप्रवृत्ती, ऑलिव्ह तेलामुळे होऊ शकणारे पित्तविकार- या सर्व आरोग्यसंकटांकडे भारतीयांनी काणाडोळा करावा काय?

आपल्या उत्पादनांचे ढोल पिटताना या अन्नपदार्थांचे हे आरोग्यधोके का सांगितले जात नाहीत?

त्याला आर्थिक पैलूसुद्धा आहे. २०१५-१६ या वर्षांत परदेशी सफरचंदे खरेदी करण्यासाठी भारताला तब्बल १७५५ कोटी रुपये मोजावे लागले. या वर्षी ऑलिव्ह तेलाची भारताची खरेदी १३,५०० टनांवर जाईल अशी अपेक्षा आहे. ऑलिव्ह तेलाच्या लीटरमागे अगदी वीस टक्के- म्हणजे २०० रुपये फायदा आहे असे गृहीत धरले तरी १३,५०० टन तेल विकले गेल्यास दोन अब्ज सातशे कोटी रु. इतका फायदा विक्रेत्यांना होईल.

आजमितीस भारतीयांना एक कोटी १७ लाख टन खाद्यतेल लागते. त्यातला केवळ ०.१ टक्क्याहून कमी वाटा ऑलिव्ह तेलाचा आहे; जो वाढविण्यासाठी पद्धतशीरपणे प्रयत्न केले जात आहेत. भारतीयांना ज्याची गरज नाही अशा ऑलिव्ह तेलाचा आपल्या खाद्यतेलांच्या सेवनातील हा वाटा जर दहा टक्क्यांवर गेला तर परकीय देशांना त्यातून होणाऱ्या नफ्याचा आकडा किती प्रचंड असेल याची कल्पनाच केलेली बरी.

सकाळचा नाश्ता, रोजच्या जेवणासाठी लागणारे खाद्यतेल, जेवणातील प्रमुख धान्य, भाजी, फळे, सुकामेवा असे सगळेच अन्नपदार्थ जर आपण अमेरिका व युरोपमधून आयात करणार असू, तर त्याचा आपल्या देशाचा आर्थिक ताळेबंद आणि एकंदर आर्थिक स्थर्यावर काय व किती विपरीत बोजा पडेल याची कल्पनासुद्धा करता येणार नाही. परकीय खाद्यान्नातून देशाचे होणारे हे आर्थिक नुकसान व भारतीयांच्या आरोग्याला संभवणारे धोके समाजासमोर येणे म्हणूनच अगत्याचे आहे.

आज जग जवळ आले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या देशांतील अन्नपदार्थांचा चवीमध्ये बदल म्हणून आनंद घेण्यास काहीच हरकत नाही. मात्र, तो आपल्या नित्य सेवनाचा आहार बनला तर आरोग्याची पार वासलात लागेल, हे नक्की. आयुर्वेदानुसार, जो आहार देशसात्म्य आहे- अर्थात निसर्गतः तुमच्या प्रदेशामधील आहे, तोच तुमच्या आरोग्याला अनुकूल आहे. आपल्या गुणसूत्रांना सर्वस्वी परक्या प्रदेशांमध्ये पिकलेले अन्नपदार्थ आपल्या आरोग्याला पूरक होण्याची शक्यता नाहीच; उलट, ते बाधक ठरेल. तसेच विविध आजारांनाही कारणीभूत ठरेल.

आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा असा की, याच पाश्चात्त्यांनी आपल्या बापजाद्यांना लाल तांदूळ सोडून पांढरा, रिफाइण्ड तांदूळ खायला शिकवले; जे आता पांढरा तांदूळ आरोग्याला कसा घातक आहे, हे पटवून लाल तांदळाचे गुणगान गाऊ लागले आहेत. याच पाश्चात्त्यांनी दातांवर मिठाचे मंजन करणाऱ्या आपल्या पूर्वजांना अडाणी ठरवले आणि आता त्याच टुथपेस्टमध्ये मीठ आहे का विचारताहेत.

यांनीच आपल्या मागच्या दोन पिढ्यांना वनस्पती घी खायला घालून रोगी बनवले आणि नंतर वनस्पती घी कसे घातक आहे, ते सांगू लागले. यांनीच खोबरेल तेलामुळे कोलेस्टेरॉलचा व हार्ट अटॅकचा धोका बळावतो असे सांगितले; आणि आज तेच खोबरेल तेलाचे प्राशन कसे दीर्घायुष्य देते, हे सांगत आहेत. यांनीच गूळ खाल्ल्यामुळे कृमी होतात, असे सांगून भारतीयांना साखरेची चटक लावली; आणि आता साखरेमुळेच अनेक रोग होतात, असे म्हणू लागले आहेत. ज्या पाश्चात्त्यांची आहारासंबंधीची मते हरघडी बदलत असतात, त्यांच्या सल्ल्यावर, आहारावर विश्वास ठेवायचा कसा?

तोही आयुर्वेदासारखी संपन्न आरोग्य परंपरा व समृद्ध आहार-संस्कृती ज्यांना लाभली आहे त्या देशवासीयांनी?

**- लेखक: डॉ. अश्विन सावंत**

# अमेरिकेतील 'मराठी' शाळा

**महाराष्ट्रात** आपण मराठी शाळा असा उल्लेख करतो, तेव्हा आपल्याला 'मराठी माध्यमाच्या' शाळा असे अभिप्रेत असते. परंतु अमेरिकेतील मराठी शाळा वेगळ्या आहेत. इंग्रजी शाळेत जात असलेल्या मुलांना मराठी भाषा शिकविण्यासाठी शनिवार, रविवार चालविलेल्या या शाळा असतात. या शाळांमध्ये काही पालकांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारलेली असते. अर्थातच ते ही भूमिका सेवाभावी वृत्तीने पार पाडतात.

साठ-सत्तरच्या दशकात मराठी वंशाचे लोक भारतातून अमेरिकेत नोकरीनिमित्त व व्यवसायानिमित्त गेले आणि तेथेच स्थायिक झाले. मराठी भाषिकांना एकत्र आणून अमेरिकेत पहिले महाराष्ट्र मंडळ, शिकागो येथे १९६९ साली स्थापन झाले. त्यानंतर इतर ठिकाणीही महाराष्ट्र मंडळे स्थापन होऊन मराठी भाषिकांचे भाषेचे आदान-प्रदान वाढू लागले.

पण प्रश्न आला तो अमेरिकेत जन्मलेल्या मराठी वंशाच्या मुलांच्या भाषेचा. पुढच्या पिढीची ही मुले अमेरिकन शाळेत शिकत होती. अमेरिकेतील पाळणाघरात ठेवली जात होती. त्यामुळे त्यांच्यावर इंग्रजी संस्कार होऊ लागले. आठ-दहा वर्षांची मुले मराठी संस्कृतीपासून खूपच दूर गेलेली वाटत होती. कधी भारतात गेल्यावर, त्यांच्या नातलगांशी नीट संवादही करत नव्हती. आजी- आजोबांच्या गोष्टी तरी यांना कशा समजाव्या? आपल्या मुलांना नातलगांचे प्रेम मिळावे, यासाठी काही तरी पूल तयार व्हायला हवा होता.

त्यानुसार काहींनी मुलांना मराठी शिकवण्यासाठी आपापल्या घरातच शाळा सुरू केली. १९७९ साली सुधा टोळे आणि श्रीमती कदम यांनी न्यू जर्सीत पहिली मराठी शाळा सुरू केली. त्यानंतर काही वर्षांच्या अंतराने इतरही ठिकाणी मराठी शाळा सुरू होऊ लागल्या.

स्नेहल वझे यांनी पुढाकार घेऊन शनिवार, रविवारच्या सुट्टीत आपल्या आणि मैत्रिणीच्या मुलांना एकत्र आणून आपल्या घरातच खेळीमेळीच्या वातावरणात मराठी शिकवायचे ठरवले. हळूहळू या उपक्रमाला यश येऊ लागले. तिच आजची न्यू जर्सीमधील 'मॉर्गनव्हील मराठी शाळा.'

साउथ ब्रुन्सवीक मराठी शाळा १९९३च्या दिवाळी पाडव्याच्या दिवशी स्थापन झाली. आल्हाद साठे यांनी आपल्या मुलांबरोबर इतरही मुलांना मराठी शिकवण्यास सुरुवात केली. या शाळेत आता पाच ते पंधरा वर्षांची मुले आहेत. अक्षर ओळख, मराठी वाचन आणि बोलणं यांवर भर दिला गेला. कथाकथन, नाट्यसादरीकरण यातून या शाळेतील मुलांची बऱ्यापैकी प्रगती झाली. मराठी संस्कृतीबरोबर अमेरिकन सण देखील या शाळेत साजरे केले जातात. सध्या ही शाळा लायब्ररीमध्ये भरते. तिला अनेक स्वयंसेवक लाभले आहेत.

एडिसन, न्यू जर्सी येथे मराठी शाळा आहे. कोविड काळात २०२०-२१ साठी ही शाळा ऑनलाइन सुरू होती. एडिसन मराठी शाळा ही शिक्षक पालक यांच्या स्वयंसेवी संघटनेवर चालते. शाळेचे वर्ग सप्टेंबर ते जून ह्या शालेय वर्षात, दर रविवारी वैंग्प ण्दस्स्ल्हगूब णहू(व्ण), एडिसन, न्यू जर्सी येथे भरतात. तीन-चार विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या मराठी शाळेत, या वर्षी नव्वद विद्यार्थी शिकत आहेत. २००७च्या आसपास बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या लक्षात आले की, या शिक्षणाला काही स्तर असावा. म्हणून हे उद्दिष्ट साधण्यासाठी त्यांनी नेमलेल्या समितीतील सुनंदा टूमणे आणि विजया बापट यांनी मेहनत करून शाळांसाठी अभ्यासक्रम बनवला. या अभ्यासक्रमात अमेरिकेतील रोजच्या जीवनातील आणि मुलांच्या ओळखीचे संदर्भ घेतले होते. २००९-१०च्या दरम्यान लीना देवधरे यांना भारती विद्यापीठ पुणे, यांची मान्यता मिळविण्यात यश आले. त्यामुळे नॉर्थ अमेरिकेतील बहुतांशी मराठी शाळा आता बी. एम. एम.चा अभ्यासक्रम अनुसरतात.

नॉर्थ कॅरोलायना येथे १९९४ मध्ये 'विद्या मंदिर' नावाची मराठी शाळा स्थापन झाली होती. ती विनोद बापट आणि विजया बापट यांनी स्थापन केली होती.

शिकागो येथे २०१४ मध्ये मराठी शाळा स्थापन झाली. विद्या जोशी या शाळेच्या कॉर्डिनेटर होत्या. त्यांनी शाळेला चांगले नावारूपाला आणले. तेथे आज शंभरच्यावर विद्यार्थी असून, ही शाळा दोन बॅचेस मध्ये चालते. या शाळेला इलिनॉईस स्टेट ऑफ बोर्डकडून मान्यता मिळाली आहे. मराठी भाषेच्या परीक्षेचे मार्क हायस्कूल ?डमिशनसाठी ग्राह्य धरले जातात. याशिवाय अटलांटा येथील मराठी शाळा २००९ साली स्थापन झाली आहे. आधी 'किलबिल'चे वर्ग आणि त्यानंतर वरच्या वर्गांमध्ये बी. एम. एम. चे अभ्यासक्रम लागू होतात. या शाळेला सुद्धा जॉर्जिया स्टेटकडून मान्यता मिळाली आहे.

न्यूजर्सीमध्ये एकूण पाच मराठी शाळा नावारूपाला आल्या आहेत. तसेच इतरही काही शाळा आहेत. २०२३च्या ऑक्टोबरमध्ये कार्यक्रमाच्या दौऱ्याच्या निमित्ताने मी आणि माझे पती हेमंत साने, न्यू जर्सी येथे राहिलो होतो. तेव्हा न्यू जर्सीच्या एडिसन मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका मेधा राजामनूर यांचे आम्हाला आमंत्रण आले. पालकांच्या उपस्थितीतच मी मुलांना गोष्टी सांगितल्या. हेमंत साने यांनी स्वतः संगीत दिलेली बालगीते म्हणून दाखविली व मुलांकडून म्हणूनही घेतली.

न्यू जर्सी येथील ब्रिजवॉटर मराठी शाळेच्या शिक्षिका नूतन यांनी एका पालकाच्या घरी आमच्या भेटीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी एक छोटेखानी शिबीर आयोजित केले. तिथेही आम्ही विद्यार्थ्यांसाठी गाणी, गोष्टी, निवेदन यांचा तास घेतला. अशा तऱ्हेने मराठी भाषा आणि मराठी संस्कृती अमेरिकेत जन्मणाऱ्या पुढील मराठी पिढ्यांकडेही उत्तमरीत्या संक्रमित होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

**- मेघना साने**

# मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची करीना कपूरला नोटीस!

भोपाळ, दि. १४ (प्रतिनिधी) - बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री करीना कपूर खानला मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने एका प्रकरणात नोटीस बजावली आहे. या नोटीसला सात दिवसांत उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

करीना कपूरने तिच्या गरोदरपणाच्या अनुभवावर छापलेल्या एका पुस्तकाचं शीर्षक वादाच्या भोवऱ्यात सापडलं आहे. त्याचसंबंधी ही नोटीस करीनाला बजावण्यात आली आहे.

करीना कपूरने २०२१ मध्ये 'करीना कपूर खान प्रेग्नन्सी बायबल' हे तिचे पुस्तक लॉन्च केले होते. या पुस्तकाच्या शीर्षकामध्ये 'बायबल' हा शब्द वापरल्याने तिने ख्रिश्चन समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप तिच्यावर करण्यात आला. ॲडव्होकेट ख्रिस्तोफर अँथनी यांनी करीना कपूरविरोधात जबलपूरच्या स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीत त्यांनी म्हटलं की, करीनाने ख्रिश्चन समुदायाच्या भावना दुखावल्या आहेत कारण 'पवित्र ग्रंथ बायबल'ची तुलना करीनाच्या गर्भधारणेशी होऊ शकत नाही. पण पोलिसांनी करीनाच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यास नकार दिला.

त्यानंतर ॲडव्होकेट ख्रिस्तोफर अँथनी यांनी मॅजिस्ट्रेट कोर्टात जाऊन खासगी तक्रार दाखल केली. पण 'बायबल' या शब्दाचा वापर करुन करीनानं ख्रिश्चन समाजाच्या भावना कशा दुखावल्या गेल्या? हे सिद्ध करण्यात ख्रिस्तोफर अयशस्वी ठरल्याने दंडाधिकारी न्यायालयानेही याचिका फेटाळून लावली. यानंतर त्यांनी अतिरिक्त सत्र न्यायालयात धाव घेतली असता तेथेही त्यांची याचिका फेटाळण्यात आली. अशा परिस्थितीत आता त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

# सलमान खानच्या घरावर गोळीबार प्रकरणात सहावा आरोपी ताब्यात!

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) - बॉलिवूडचा भाईजान अभिनेता सलमान खानच्या घरावर १४ एप्रिल रोजी अज्ञातांकडून गोळीबार करण्यात आला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून कसून तपास सुरू आहे. या घटनेची जबाबदारी तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिष्णोई याचा भाऊ अनमोल बिष्णोई याने घेतली. यानंतर मुंबई पोलिसांनी हरियाणातील फतेहाबाद येथून आणखी एकाला अटक केली आहे. हा सहावा आरोपी आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई पोलिसांनी राजस्थानमधून आरोपीला अटक केली होती. त्यानंतर आज हरियाणामध्ये ही कारवाई करण्यात आली.

हरपाल सिंग असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो ३७ वर्षांचा आहे. पोलिसांनी सांगितले की, आरोपी हरपाल सिंगने या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पाचव्या आरोपी मोहम्मद रफिक चौधरीला आर्थिक मदत केली होती आणि रेकी करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. आरोपीला आज विशेष मकोका न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

**आठवडाभरापूर्वी राजस्थानमधून पाचव्या आरोपीला अटक**

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने ७ मे रोजी राजस्थानमधून पाचव्या आरोपीला अटक केली होती. राजस्थानमधून अटक केलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद रफिक चौधरी असे आहे. चौधरी याने या प्रकरणात अटक केलेल्या सागर पाल आणि विकी गुप्ता या दोन शूटर्सना पैसे आणि रेकी करण्यासाठी मदत केली होती. सलमान खानच्या घराजवळ १४ एप्रिल रोजी गोळीबार करण्यात आला.

मुंबई पोलिसांनी या प्रकरणी अत्यंत वेगाने हालचाली करत आरोपींना ताब्यात घेतले. दरम्यान, यातील एका आरोपीने अनुज थापनने १ मे रोजी तुरुंगात आत्महत्या केली. सध्या या प्रकरणाचा आणखी तपास सुरु आहे. हरपाल सिंगकडून आणखी काय खुलासे होणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# वैजापूरात श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमाचे भक्तांनी घेतले दर्शन



वैजापूर, दि. १४ (प्रतिनिधी) - श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट) अक्कलकोट यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा निमित्त पालखीचे आगमन वैजापूर शहरात न्यू स्वामी समर्थ भोजनालय येथे सोमवार संध्याकाळी (ता. १३) रोजी आगमन झाले. मुक्काम केल्या नंतर मंगळवार(ता. १४)रोजी अनिल प्रभाकर गुळस्कर यांच्या घरी सकाळी ११ वाजता आरती झाली. या प्रसंगी भक्त भाविकांची मोठी गर्दी केली होती, पालखी सोबत संजय गुरुजी महाराज होते. या प्रसंगी विनोदराव दरांगे, कोमल विनोदराव दरांगे अनिल प्रभाकर गुळस्कर, उषा अनिल, गुळस्कर, सुनील प्रभाकर गुळस्कर, राजू प्रभाकर गुळस्कर, रोहित गुळस्कर, जेष्ठ नागरिक ठा. धोंडीरामसिंह राजपूत, राजेंद्र पवार, अनिल पवार,यांनी पालखीचे व पादुकांचे स्वागत करून दर्शन घेतले. गेल्या२७ वर्षापासून हा पादुका परिक्रमा सोहळा पवार परिवाराच्या वतीने वैजापूरात श्री स्वामी समर्थ भोजनालय येथे होत आलेला आहे. गायकवाडवाडी परिसरातील भक्त -भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गुळस्कर परिवाराने हे आयोजन गायकवाडवाडी येथे केले होते.

# शाई पुसून पुन्हा मतदान करण्याच्या तयारीतील ६ जण ताब्यात

छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - मतदान केल्यानंतर बोटावरील शाई पुसून पुन्हा मतदान करण्याच्या तयारीत असणाऱ्या ६ तरुणांना पकडण्यात आले, हि घटना बुढ्ढीलाईन व ज्युबिली पार्क येथे घडली. याप्रकरणी सिटी चौक पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. शेख मोबीन शेख जलील अहेमद (३५, रा. शहा कॉलनी, उस्मानपुरा), सय्यद साजीद सय्यद साबेर (२७, रा. सागर हॉटेलच्या मागे, बुढ्ढीलाईन), अनिस खान मसूद खान (४१, रा. बुढ्ढीलाईन), सय्यद सलाउद्दीन शकूर सालार (३९, रा. बुढ्ढीलाईन), तारेख बाबू खान (२३, रा. मिलकॉर्नर), मुदस्सिर इमरान खान (१९, रा. कोतवालपुरा) अशी आरोपींची नावे आहेत.

१३ मे रोजी पावणे १२ वाजेच्या सुमारास बुढ्ढीलाइनमधील सागर ऑप्टिकल्सजवळ तसेच ज्युबिली पार्क येथील एमएसईबी कार्यालयासमोर बोगस मतदानाचा प्रकार घडला. काही तरुण मतदान करून आल्यानंतर बोटावर काही तरी रसायन लावून ती शाई पुसून पुन्हा मतदान करण्यासाठी जात असल्याची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिली.

पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत काही तरुणांना ताब्यात घेतले. बुढ्ढीलाईन आणि ज्युबिली पार्क या दोन्ही ठिकाणी पोलीसांनी तरुणांकडून रिन फॅब्रिक व्हाईटनरची प्रत्येकी एक बाटली जप्त केली. पोलिस अंमलदार प्रेमसिंग चव्हाण यांच्या तक्रारीवरून सिटीचौक पोलीस ठाण्यात सहा तरुणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धक्कादायक! काळी जादू नष्ट करण्याच्या नावाखाली ज्योतिषाने महिलेकडून उकळले १५ लाख

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) - विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात एकामागोमाग एक धक्कादायक प्रकार घडत आहेत. कधी भीषण अपघात, कधी ड्रग्जची तस्करी, कधी मर्डर, मारामारी असे प्रकार घडत असताना पुण्यात आणखी एक खळबळजनक घटना घडली आहे. काळी जादू घालवतो असे म्हणत एका ज्योतिषाने महिलेला तब्बल १५ लाखांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका २८ वर्षीय तरुणीची उत्तर प्रदेशमधील कृष्णनारायण तिवारी नावाच्या एका ज्योतिषाशी ओळख झाली होती.

आपले पतीसोबत नेहमी भांडण होत आहे, असे तिने ज्योतिषी तिवारी याला सांगितले होते. यावर तुमच्या घरावर कोणीतरी काळी जादू केली आहे, ती नष्ट करतो, त्यासाठी पूजा करावी लागेल, असे ज्योतिषाने संबंधित महिलेला सांगितले.

महिलेने सांगितल्याप्रमाणे ज्योतिषी एके दिवशी पिवळ्या रंगाचे कपडे घालून त्या तरुणीच्या घरी गेला. पूजा झाल्यावर प्रसादात त्याने गुंगीचे औषध देऊन तरुणीचे अंतर्वस्त्रातील फोटो काढले. नंतर तुझे हे फोटो तुझ्या कॉन्टॅक्टमध्ये असलेल्या इतरांना पाठवेल अशी धमकी देत त्याने वेळोवेळी पैशांची मागणी केली. धमकीला घाबरून त्या तरुणीने १५ लाख ३० हजार रुपये त्याला पाठवले.

दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने थेट पोलीस ठाणे गाठले. याप्रकरणी उत्तर प्रदेशचा ज्योतिषी कृष्णनारायण तिवारी आणि अंतिम कृष्णनारायण तिवारी यांच्यावर वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# 'भिडू' शब्दावरुन जॅकी श्रॉफची दिल्ली हायकोर्टात धाव!

नवी दिल्ली, दि. १४ (वृत्तसंस्था) - अभिनेते किंवा अभिनेत्री आपल्या एखाद्या डायलॉगने किंवा स्टाईलने प्रसिद्ध होत असतात. त्यांचा एखादा डायलॉग प्रेक्षकांच्या मनात घर करुन राहतो आणि कालांतराने तीच त्यांची ओळख बनून जाते. प्रसिद्ध अभिनेता जॅकी श्रॉफचीही स्टाईल खूप फेमस आहे. जॅकी श्रॉफ हा आपल्या बोलण्यात भिडू या शब्दाचा वापर करतो. त्याची बोलण्याचीही एक वेगळी स्टाईल आहे. त्यामुळेच जॅकी श्रॉफ हा बॉलिवूडच्या इतर अभिनेत्यांपेक्षा वेगळा ठरतो. मात्र, या स्टाईल आणि भिडू शब्दामुळे जॅकीने दिल्ली हायकोर्टात धाव घेतली आहे. जाणून घेऊयात नेमकं प्रकरण काय.

जॅकी श्रॉफने दिल्ली हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेत आपल्या खासगी आणि सार्वजनिक अधिकारांच्या संरक्षणाची मागणी केली आहे. त्याशिवाय, पूर्वसंमतीशिवाय आपले नाव, फोटो, आवाज आणि 'भिडू' शब्द वापरणाऱ्यांविरोधात खटला दाखल केला आहे. सोशल मीडिया आणि एआय ॲप्सशिवाय इतर कोणत्याही प्लॅटफॉर्मवर त्याचा आवाज, फोटो किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्याही बाबी वापरण्यापूर्वी त्याच्याकडून परवानगी घ्यावी, असे निर्देश हायकोर्टाने द्यावेत अशी मागणी जॅकीने केली आहे.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. आज टी.व्ही. सेंटर येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास मा.उप आयुक्त अंकुश पांढरे, रविंद्र जोगदंड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मा.सहायक आयुक्त झोन क्रं.०४ अशोक गिरी, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, जनसंपर्क विभागाचे रविंद्र खरात, करण साळवे, उद्यान विभागाचे राऊत, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन !



**छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांचे प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# संभाजीनगरमध्ये ६३.०७ % मतदान

छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघासाठी सोमवारी (दि. १३) ११ तास चाललेल्या मतदान प्रक्रियेत सरासरी ६३.०७ टक्के मतदान झाले. मतदारसंघातील १८ केंद्रांवर सायं. ६ वाजेनंतरही मतदान सुरू होते. त्यामुळे मतदानाची अंतिम टक्केवारी घोषित करण्यास प्रशासनाला उशीर झाला. २०१९ साली ६३.४८ टक्के मतदान झाले होते, त्या तुलनेत मतदानाचा टक्का घसरला; पण मतदारांनी जेमतेम 'फर्स्ट क्लास' राखला. ३७ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले. बीड बायपासवरील एमआयटी कॉलेजमध्ये ४ जूनला मतमोजणी होणार आहे.

दिवसभर शांततेत मतदान झाले. सरासरी ६३.०७ टक्के मतदान झाल्याची प्राथमिक माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली. या आकडेवारीत बदल होण्याची देखील शक्यता आहे. पहिल्या व शेवटच्या टप्प्यातील वैजापूर, गंगापूर व औरंगाबाद मध्य, पूर्व आणि पश्चिम या सहा विधानसभा मतदारसंघांतील २० लाख ६१ हजार २२० पैकी सरासरी १२.५० लाख मतदारांनी मतदान केले.

# मुंबई पोलिसांची राजस्थानमध्ये मोठी कारवाई! १०४ कोटींचा कच्चा माल जप्त

जोधपूर, दि. १४ (वृत्तसंस्था) - गेल्या काही दिवसांत अवैध पदार्थांच्या तस्करीचे प्रमाण वाढले आहे. त्यातच मुंबई पोलिसांना राजस्थानमध्ये नशा वाढवणाऱ्या औषधांची निर्मिती करणारा कारखाना असल्याची खबर मिळाली आणि पोलिसांनी तातडीने त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला. धक्कादायक बाब म्हणजे या छाप्यात तब्बल १०४ कोटींचा कच्चा माल आढळला आहे. मेफेड्रोन (शब्दिहा) आणि इतर औषध बनवण्यासाठी वापरली जाणारी रसायने देखील जप्त करण्यात आली आहेत. डिसेंबर २०२३ मुंबई पोलिसांनी केलेल्या एका कारवाईमुळे पोलिसांना या कंपनीविषयी माहिती मिळाली आणि पोलिसांनी या कंपनीचा भांडाफोड केला.

मुंबई पोलिसांनी डिसेंबर २०२३ मध्ये अंमली औषधांच्या तस्करीप्रकरणी तीन जणांना अटक केली होती. पोलिसांना त्यावेळी केलेल्या चौकशीतील राजस्थानच्या जोधपूरमध्ये चालवल्या जाणाऱ्या औषध निर्मितीच्या कंपनीची माहिती मिळाली होती. पोलिसांनी या कंपनीचा भांडाफोड करत मालक हुकुमराम चौधरीला अटक केली आहे. सोबतच सर्व कच्चा मालही जप्त केला आहे, ज्याची किंमत १०४ कोटी रुपये आहे.

**नेमकं काय घडलं?**

मुंबई पोलिसांनी नववर्षाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३१ डिसेंबरला शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. याचं कारण म्हणजे साकीनाका पोलीस स्टेशनच्या चंद्रकांत पवार यांना काही लोक मेफेड्रोन विकण्यासाठी येत असल्याची माहिती मिळाली होती. मुंबई पोलिसांनी या माहितीवरून कारवाई करत सरफराज शेख (२२), माजिद उमर शेख (४४), अब्दुल कादर शेख (४४) यांना अटक केली होती. या तीन आरोपींकडून त्यावेळी ३.३३५ कोटी रुपयांचं १.६५५ किलोग्राम मेफेड्रोन जप्त केलं होतं.

डीसीपी मंगेश शिंदे यांनी मुंबईत या तीन आरोपींना अटक केल्यानंतर आरोपींनी मेफेड्रोन कुठून खरेदी केली याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना अधिक चौकशी केली असता राजस्थानच्या जोधपूरमध्ये नशा वाढवणाऱ्या औषधांची निर्मिती करण्यात येत असल्याची माहिती मिळाली होती. मुंबई पोलिसांनी तीन आरोपींच्या कॉल डिटेल्सच्या आधारावर पुण्यातील प्रशांत पाटील या व्यक्तीला ताब्यात घेतलं होतं.

प्रशांत पाटीलकडे चौकशी केल्यानंतर जोधपूरच्या कारखान्याची माहिती मिळाली. प्रशांत पाटील याने मुंबई पोलिसांना सांगितलं की जोधपूरमधील हुकूमराम चौधरी जोधपूरच्या सचिन कदमच्या सांगण्यावरुन औषधांची कंपनी चालवत होता. यानंतर पोलिसांनी तातडीने या कंपनीवर छापा टाकत मेफेड्रोन आणि त्याच्या निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल जप्त केला. ज्याची किंमत १०४ कोटी रुपये आहे.

# जालना लोकसभा मतदारसंघात ६९.१८ टक्के मतदान

जालना, दि. १४ (प्रतिनिधी) :- लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जालना लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी उत्साहात मतदान पार पडले. एकूण ६९.१८ टक्के मतदान झाले. जिल्हा प्रशासनाने मतदार जनजागृतीसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांना प्रतिसाद देत प्रशासनाच्या आवाहनाला दाद देऊन मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान केले.

सोमवार, दिनांक १३ मे २०२४ रोजी जालना लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली. जालना लोकसभा मतदारसंघातील ६ विधानसभा मतदारसंघातील आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

जालना- एकूण मतदार संख्या पुरुष १,७३,९५५, महिला १,५४,२२२ व इतर ३५ असे एकूण ३,२८,२३२ मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या पुरुष १,०९,१०३, महिला ९०,७७७ व इतर ६ असे एकूण १,९९,८८६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ६२.७१ टक्के, महिला ५८.८६ टक्के व इतर १७.१४ टक्के अशा एकूण ६०.९० टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

बदनापूर- एकूण मतदार संख्या पुरुष १,६८,३४०, महिला १,५३,५४८ व इतर ५ असे एकूण ३,२१,८९३ मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान करणाऱ्यांची संख्या पुरुष १,२५,०१२, महिला १,०६,१३५ व इतर १ असे एकूण २,३१,१४८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ७४.२६ टक्के, महिला ६९.१२ टक्के व इतर २० टक्के असे एकूण ७१.८१ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

भोकरदन —एकूण मतदार संख्या पुरुष १,६२,९८७, महिला १,४९,०३८ व इतर ० असे एकूण ३,१२,०२५ मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान करणाऱ्यांची संख्या पुरुष १,२३,५१६, महिला १,०८,१७६ व इतर ० असे एकूण २,३१,६९२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ७५.७८ टक्के, महिला ७२.५८ टक्के व इतर ० टक्के असे एकूण ७४.२५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

सिल्लोड - एकूण मतदार संख्या पुरुष १,७९,०१७, महिला १,६०,८२६ व इतर ४ असे एकूण ३,३९,८४७ मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान करणाऱ्यांची संख्या पुरुष १,२५,९२९, महिला १,०८,१०८ व इतर २ असे एकूण २,३४,०३९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ७०.३४ टक्के, महिला ६७.२२ टक्के व इतर ५० टक्के असे एकूण ६८.८७ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

फुलंब्री - एकूण मतदार संख्या पुरुष १,८४,९८५, महिला १,६६,८१९ व इतर ४ असे एकूण ३,५१,८०८ मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान करणाऱ्यांची संख्या पुरुष १,३१,१८८, महिला १,१०,८६० व इतर १ असे एकूण २,४२,०४९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ७०.९२ टक्के, महिला ६६.४६ टक्के व इतर २५ टक्के असे एकूण ६८.८० टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

पैठण - एकूण मतदार संख्या पुरुष १,६४,८०२, महिला १,४८,९६३ व इतर ४ असे एकूण ३,१३,७६९ मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान करणाऱ्यांची संख्या पुरुष १,२१,१२७, महिला १,०१,२७८ व इतर १ असे एकूण २,२२,४०६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ७३.५० टक्के, महिला ६७.९९ टक्के व इतर २५ टक्के असे एकूण ७०.८८ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे), औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. ९३२५२१११०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. बातम्या व इतर मजकुराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायक्षेत्र)

# ...तर नोबेलचे पहिले मानकरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर असते-डॉ.रमेश गोलाईत

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- जर पन्नासच्या दशकात अर्थशास्त्रामध्ये नोबेल पारितोषिक सुरू झाले असते तर प्रथम पारितोषिक थोर अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच मिळाले असते, एवढेच नव्हे तर अर्थशास्त्रातील महान संशोधनाबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लागोपाठ सलग तीन वेळाही नोबेल पारितोषिक मिळाले असते, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व बँकेचे (मुंबई ) डेप्युटी डायरेक्टर ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ.रमेश गोलाईत यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेडिकोज असोसिएशन (डामा) हेल्थ केअर फाउंडेशनच्यावतीने आयोजित पदग्रहण तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती समारंभात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते, महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा विभागाचे डेप्युटी डायरेक्टर डॉ.भूषण कुमार रामटेके , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-रुग्णालयाचे उप अधिष्ठाता डॉ.भारत सोनवणे हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेडिकोज असोसिएशन( डामा) हेल्थ केअर फाउंडेशनचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ. एम.डी.गायकवाड हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

आरबीआयचे डेप्युटी डायरेक्टर डॉ.गोलाईत पुढे म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या इतकी बुद्धिमत्ता असलेला अर्थतज्ज्ञ त्यावेळी भारतात कोणी नव्हता. अर्थशास्त्रीय संशोधनाबद्दल त्यांना सलग तीन वेळा नोबल पारितोषिक मिळाले असते एवढे अर्थशास्त्रातील त्यांचे कार्य महान होते. ते पुढे म्हणाले, डॉ. आंबेडकरांना घटनेचे शिल्पकार व अन्य उपाध्यांमध्येच सीमित करण्यात आले आहे,त्यांच्या प्रबंधाने भारतीय अर्थविश्व आणि त्याची सर्व सूत्रे हाती असलेल्या ब्रिटिश अर्थविश्वात एक निर्णय भूमिका बजावली ,त्यातूनच आज भारतीय अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळणारी रिझर्व बँक ऑफ इंडिया उभी राहिली आहे. डॉ.गोलाईत यांच्या या भाषणाने प्रभावित सभागृहांने एक मिनिटे उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करत त्यांना दात दिली.

आरोग्य विभागाचे डेप्युटी डायरेक्टर डॉ. भूषण कुमार रामटेके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात बुद्ध कबीर व फुले या तीन गुरूंचे तसेच विद्या स्वाभिमान व शील या तीन दैवतांचे अतिशय महत्त्व असल्याचे सांगितले, डॉ. आंबेडकरांनी या गोष्टीचा आपल्या संपूर्ण जीवनात अनेक ठिकाणी उल्लेख केल्याचा उहापोह देखील डॉ.रामटेके यांनी केला. घाटीचे उपअधिष्ठाता डॉ.भारत सोनवणे यांनी आपण समाजाचे देणे लागतो ही भावना मनात ठेवून सर्वांनी कार्य केले पाहिजे,काळाची ती गरज आहे असे सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेडिकोज असोसिएशन (ड्रामा) हेल्थ केअर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.एम.डी. गायकवाड यांनी शहरात लवकरच ५०० बेडचे मल्टी स्पेशलिटी आणि सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल उभारण्यात येणार असल्याचा संकल्प जाहीर केला.त्यामध्ये अलोपॅथिक ,आयुर्वेदिक, होमिओपॅथिक तसेच डेंटल या वैद्यकीय शाखेतील सर्व डॉक्टरांचे सहकार्य घेण्यात येईल.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या आर्थिक कमकुवत विद्यार्थ्यांसाठी दत्तक योजना सुरू करून त्यांना आर्थिक मदतीचा हातभार लावला जाईल. आगामी दहा वर्षात आंबेडकरी डॉक्टरांना या हॉस्पिटलमध्ये सामावून घेतले जाईल. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून शहरातील सर्व बुद्धविहारांमध्ये सुपर स्पेशालिटी डॉक्टरांची विनामूल्य सेवा गरजू रुग्णांना देण्यात येईल असेही डॉ. गायकवाड यांनी सांगितले.

प्रारंभी, तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर दीप प्रज्वलन करण्यात आले. 'डामा'चे जनरल सेक्रेटरी डॉ.विशाल वाठोरे यांनी प्रास्ताविक केले.यावेळी ४५ डॉक्टरांनी पदग्रहण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनीषा अंभोरे यांनी केले तर आभार डॉ. संजय पगारे यांनी मानले.'डामा'चे उपाध्यक्ष डॉ.प्रमोद दुथडे ,डॉ. विना गायकवाड, डॉ. प्रमोद धनजकर ,डॉ. प्रवीण चाबुकस्वार, डॉ. प्रज्ञा बनसोडे,डॉ.अविनाश सोनवणे, डॉ. साहेब वाकडे, डॉ.सागर वानखेडे, डॉ. नचिकेत शेरे,डॉ.सलेना लोणारे, डॉ. श्रुती चिंचखेडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.शेवटी राष्ट्रगीतांने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.आहे,त्यांच्या प्रबंधाने भारतीय अर्थविश्व आणि त्याची सर्व सूत्रे हाती असलेल्या ब्रिटिश अर्थविश्वात एक निर्णय भूमिका बजावली ,त्यातूनच आज भारतीय अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळणारी रिझर्व बँक ऑफ इंडिया उभी राहिली आहे.




डॉ.गोलाईत यांच्या या भाषणाने प्रभावित सभागृहांने एक मिनिटे उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करत त्यांना दात दिली.

प्रारंभी, तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर दीप प्रज्वलन करण्यात आले. 'डामा'चे जनरल सेक्रेटरी डॉ.विशाल वाठोरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ४५ डॉक्टरांनी पदग्रहण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनीषा अंभोरे यांनी केले तर आभार डॉ. संजय पगारे यांनी मानले.'डामा'चे उपाध्यक्ष डॉ.प्रमोद दुथडे ,डॉ. विना गायकवाड, डॉ. प्रमोद धनजकर ,डॉ. प्रवीण चाबुकस्वार, डॉ. प्रज्ञा बनसोडे,डॉ.अविनाश सोनवणे, डॉ. साहेब वाकडे, डॉ.सागर वानखेडे, डॉ. नचिकेत शेरे,डॉ.सलेना लोणारे, डॉ. श्रुती चिंचखेडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.शेवटी राष्ट्रगीतांने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# मनुष्याने या मानवी जीवनाचा सदुपयोग करून आत्म्याच्या कल्याणासाठी प्रयत्न केले पाहिजेत-महाश्रमणजी

## आचार्यश्री महाश्रमण पदयात्रेने जालन्याकडे रवाना

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे ११ वे आचार्य महाश्रमणजी ८१ साधूसंतांसह रविवारी जालन्याच्या दिशेने रवाना झाले, आचार्यश्रींनी पाच दिवस शहरात मुक्काम केल्याने सकल जैन समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले होते. आचार्यश्रींनी चातुर्मासासाठी भविष्यात छत्रपती संभाजीनगरात यावे, अशी भावना भाविकांनी व्यक्त केली.

पाच दिवसांच्या आध्यात्मिक महोत्सवाची शहरात यशस्वीपणे सांगता झाली. त्यातील अक्षय्य तृतीया वर्षातप पारणा महोत्सवासाठी १८ राज्यांतून भाविक शहरात आले होते. रविवारी पुढील आध्यात्मिक कार्यक्रमासाठी आचार्यश्री जेव्हा

जालनाच्या दिशेने निघाले तेव्हा समाजबांधवांचे डोळे भरून आले होते. आचार्यश्री म्हणाले, की माणूस एकटाच जन्मतो आणि एके दिवशी तो एकटाच मरतो. लोक त्यांच्या कर्मानुसार आले आहेत. त्यांना त्यांच्या कर्माची फळे मिळतात. मनुष्याला स्वतःच्या कर्माचे भोग भोगावेच लागतात, हा सृष्टीचा नियम आहे. आपल्याला दुर्मिळ मानवी जीवन लाभले आहे. मनुष्याने या मानवी जीवनाचा सदुपयोग करून आत्म्याच्या कल्याणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. माणसाने धर्माच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कितीही अडचणी आल्या, परिस्थिती कशीही असो, माणसाने



धर्माचा मार्ग सोडू नये. कौटुंबिक समस्या असो किंवा शारीरिक समस्या, कोणत्याही परिस्थितीत धर्म सोडू नये. मनुष्याने आपल्या जीवनात हे लक्षात ठेवले पाहिजे की, या जन्मानंतर पैसा वगैरे पुढील कामांसाठी वापरता येणार नाही. म्हणून, पैसा मिळविण्यासाठी पापी कृत्ये टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माणसाने पापी कृत्ये टाळून धर्माच्या मार्गाने पुढे जाऊन आपल्या आत्म्याच्या कल्याणासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असेही आचार्यश्री म्हणाले. आचार्यश्रींचे सदैव मार्गदर्शन लाभत राहावे, अशी भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली होती. आचार्यश्रींच्या दर्शनासाठी आलेल्या अनेक भाविक पदयात्रेत सहभागी झाले. ११ किलोमीटर चालत आचार्यश्रींसोबत वरूड काझी या गावात पोहोचले.

तब्बल ६९ वर्षांनंतर जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाच्या आचार्यश्रींचे शहरात आगमन झाल्याने समाजबांधवांनी पाच दिवस शहरात दिवाळी साजरी केली. आध्यात्मिक महोत्सव यशस्वितेसाठी आचार्यश्री महाश्रमण अक्षय्यतृतीया प्रवास व्यवस्था समिती व तेरापंथ युवक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वीजग्राहकांच्या सेवेसाठी महावितरणचे 'ऊर्जा' चॅटबॉट २४ तास उपलब्ध

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधरी)- महावितरणने राज्यातील ३ कोटी वीजग्राहकांसाठी घरबसल्या एका क्लिकवर सर्व सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून वीजग्राहकांच्या संवादपर मदतीसाठी 'ऊर्जा' चॅटबॉट महावितरणची वेबसाईट व मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. इंग्रजी व मराठी भाषेतील या चॅटबॉटद्वारे महावितरणच्या विविध सेवांबाबत ग्राहकांना प्रश्न विचारता येत आहे तसेच नवीन वीजजोडणी, वीजबिल भरणा, तक्रार निवारण आदींबाबत माहिती घेण्याची सोय उपलब्ध आहे.

महावितरणच्या वीजसेवेसंदर्भात माहिती कुठे विचारावी आणि या सेवांचा घरबसल्या लाभ कसा घ्यावा हा प्रश्न आता संपुष्टात आला आहे. ग्राहकसेवांबाबत थेट प्रश्न विचारून विविध सेवांचा लाभ व तक्रारी नोंदविण्यासाठी 'ऊर्जा' नावाचे चॅटबॉट महावितरणच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने विकसीत केले आहे. राज्यातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी व इतर ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर 'ऊर्जा' चॅटबॉट www.mahadiscom.in ही वेबसाईट व महावितरणच्या मोबाईल ?पवर उपलब्ध आहे. नवीन वीजजोडणी वा त्यासाठी केलेल्या अर्जाची सद्यस्थिती, वीजबिल भरणा किंवा वीजबिलाचा तपशील, जलद वीजबिल भरणा, मोबाईल क्रमांक व ई-मेलची नोंदणी इतर विविध शुल्कांचा ऑनलाइन भरणा, स्वतः मीटर वाचन व सबमिशन, गो-ग्रीन नोंदणी, वीजवापर व बिलाचे कॅलक्यूलेटर आदींबाबत वीजग्राहकांना 'ऊर्जा' चॅटबॉट थेट मदत करीत आहे.

महावितरणच्या वीजसेवेबाबत माहिती हवी असल्यास 'ऊर्जा'च्या माध्यमातून संबंधित सेवा ग्राहकांसाठी थेट ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. संबंधित सेवेची थेट लिंक ग्राहकांना या बॉटमधूनच मिळणार आहे. यासोबतच वीजपुरवठा खंडित होणे तसेच वीजबिलांसह इतर तक्रारींबाबत संपूर्ण माहिती वीजग्राहकांना उपलब्ध होत आहे. यामध्ये तक्रार करण्यासाठी महावितरणचे २४ तास सुरू असलेले टोल फ्री क्रमांक, 'एसएमएस' क्रमांक, ई-मेल, मिस्ड कॉल सेवा आदींची माहिती बॉटद्वारे उपलब्ध आहे.

गेल्या मार्च महिन्यापासून कार्यान्वित झालेल्या 'ऊर्जा' चॅटबॉटचा वीजग्राहक मोठ्या संख्येने वापर करीत असून त्यांना वीजसेवा किंवा तक्रारी नोंदविण्याबाबत माहिती घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयांमध्ये जाण्याची आता आवश्यकता उरलेली नाही. मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेल्या ग्राहकांना मोबाईल क्रमांक किंवा ग्राहक क्रमांक सबमीट करून विविध सेवा घेण्यासाठी चॅटबॉटद्वारे महावितरणशी संवाद साधता येईल. तसेच इतर ग्राहकांना विविध सेवेचा लाभ घेता येत आहे.

# अग्रसेन विद्या मंदिर शाळेने राखली दैदिप्यमान यशाची परंपरा

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील सी.बी.एस.ई. बोर्ड निकाल जाहीर झाले असून ईटखेडा येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील नेत्रदिपक कामगिरी केली. शाळेचे एकूण १७२ विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले होते. त्यापैकी ३७ विद्यार्थी ९०टक्के पेक्षा अधिक टक्केवारी घेऊन उत्तीर्ण झाले.

शाळेतील सर्व यशवंत शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान अनुष्का निकुंभ (९८.२०टक्के) हिने मिळविला, आस्था कासलीवाल हिने (९७टक्के) मिळवून द्वितीय तर समीत साहुजी याने (९६.८०टक्के) मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय ५३ विद्यार्थ्यांनी ८०ऽ पेक्षा जास्त, ४७ विद्यार्थ्यांनी ७०ऽ पेक्षा जास्त, ३५ विद्यार्थ्यांनी ६०ऽ पेक्षा गुण मिळविले व शाळेची यशस्वी परंपरा कायम राखली.

विद्यार्थ्यांचे शाळेचे विश्वस्त केशवजी लीला, अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळेचे प्राचार्य संतोष कुमार कारवा, उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधिक्षक अजय सोनुने, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन व कौतुक केले व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मद्य धोरण प्रकरणात ईडी आपला आरोपी बनवणार

नवी दिल्ली दि.१४ (वृत्तसंस्था)- आता आम आदमी पार्टी (आप) लाही दिल्ली मद्य धोरण प्रकरणात आरोपी बनवण्यात येणार आहे. ईडीच्या वकिलांनी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांना सांगितले की, आम्ही या प्रकरणाच्या पुढील आरोपपत्रात हे करू. मंगळवारी, १४ मे रोजी दिल्ली उच्च न्यायालयात मनीष सिसोदिया यांच्या जामीन याचिकेवरील सुनावणीदरम्यान अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ही माहिती दिली. मनी लाँड्रिंग प्रकरणात सिसोदिया यांच्या जामीनाला ईडीचा विरोध आहे.

सिसोदिया यांच्या वकिलाने सांगितले की, ईडी आणि सीबीआय फक्त लोकांना अटक करत आहेत. खटल्यादरम्यान त्यांना कोणतेही प्रश्न विचारले गेले नाहीत. सिसोदिया यांच्या ८ मे रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीत ईडी आणि सीबीआयच्या वकिलांनी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांना उत्तर दाखल करण्यासाठी एका आठवड्याचा अवधी हवा असल्याचे सांगितले होते.

३ मे रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ईडी-सीबीआयला नोटीस बजावून त्यांच्याकडून उत्तर मागितले होते. सिसोदिया यांना त्यांची आजारी पत्नी सीमा यांना आठवड्यातून एकदा भेटण्याची परवानगीही देण्यात आली होती.

# ईटखेड्यात भर दुपारी घर फोडले

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- घराला कुलूप लावून भावाकडे गेले गेलेल्या कुटुंबाचे घर फोडून चोरट्याने सोन्या चांदीच्या दागिन्यांसह दीड लाख रुपयांचा ऐवजी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संजय विष्णूवात हिशोबे रा. गट नंबर ४१ वीटखेडा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १३ मे रोजी दुपारी ते घराला कुलूप लावून भावाकडे गेले होते. अज्ञात चोरट्याने घराचे लॉक तोडून बेडरूम मधील कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेले ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण, ४० हजार रुपये किमतीची सोनसाखळी, ३० हजार रुपये किमतीची अंगठी, दहा हजार रुपये किमतीचे कानातले झुंबर, तर चार हजार रुपये रोख असा एकूण १ लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. पुढील तपास सातारा पोलीस करीत आहेत.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार - २०२५ साठी ऑनलाईन अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत बाल शक्ती पुरस्कार दिला जातो. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ साठी अर्ज मागविण्यात आले आहेत,असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर.एन. चिमंद्रे यांनी कळविले आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार- ज्या मुलांनी (वय ५ पेक्षा अधिक व १८ वर्षापर्यंतच्या) शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे, त्यांना हा पुरस्कार दिला जातो.

हे अर्ज (https://awards.gov.in) या संकेतस्थळाला मार्फत ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जाणार आहेत. ज्या मुलांचे वय ५ पेक्षा अधिक व ३१ जुलै २०२४ रोजी १८ वर्षापेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी शिक्षण, कला, सांसकृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शोर्य अशा क्षेत्रात विशेष नैपुण्यपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांचे प्रस्ताव संकेतस्थळावर स्वत: मुले किंवा त्यांचे वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी, जिल्हादंडाधिकारी, पंचायत राज्य संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था इ. अर्ज करु शकतात. राज्यातून अशा प्रकारच्या मुलांचे प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्त यांनी केले आहे.

# मनाई आदेश लागू

छत्रपती संभाजीनगर दि.१४ (प्रतिनिधी)- आगामी काळात जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी दि.३१ मे पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात येत असल्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. त्याअन्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगणे, दाहक स्फोटक पदार्थ बाळगणे, पाच किंवा अधिक व्यक्तिंना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमणे, निदर्शने करण्यास मनाई करण्यात आली आहे. यासंदर्भात पूर्वपरवानगी देण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक ग्रामिण यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना राहतील,असेही अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी स्पष्ट केले आहे.

(पान १ वरुन)

# नाशिकमध्ये ८०० कोटींचा भूसंपादन घोटाळा

आहे. या ठक्कर बिल्डरने त्याच्याकडे मालकी नसताना सुद्धा या जमिनी महापालिकेला देऊन कोट्यावधीचा मलिदा त्यातून घेतलेला आहे. हेच ठक्कर बिल्डर मुख्यमंत्र्यांबरोबर मांडीला मांडी लावून बसलेले होते. याच ठक्कर बिल्डरने ३०० कोटी भूसंपादनाच्या व्यवहारातून मिळवलेले आहेत. जनतेच्या पैशांची ही सरळसरळ लूट आहे, दोन कोटींची जमीन या ठक्करने विकत घेतली आणि महापालिकेला ५० कोटींना विकली. अख्खं ठक्कर कुटुंब या व्यवहारांमध्ये अडकलेलं तुम्हाला दिसेल.

प्रत्येक व्यवहाराचा पुरावा माझ्याकडे आहे. एक फाईल मी मुख्यमंत्र्यांना पाठवणार आहे. देवेंद्र फडणवीस यांनाही पाठवणार आहे. मुख्यमंत्री, प्रधानमंत्री कार्यालय आणि ईडीला सर्व माहिती दिलेली आहे. ठक्कर बिल्डरला या प्रकरणात ३५५ कोटींचा लाभ झाला. मनवानी नावाचे एक बिल्डर आणि कुटुंब आहे. त्यांना ५३ कोटी रुपयांचा लाभ झाला झाला. शाह नावाच्या बिल्डरला आठ कोटी रुपयांचा लाभ झाला. इतर बिल्डरांना २०० कोटी रुपयांचा लाभ झालेला आहे. महापालिकेतील अधिकाऱ्यांना १२ कोटींचा लाभ झाला आहे. तुम्ही मुंबई महापालिकेच्या कोविड, खिचडीची चौकशी करता, त्यांना अटक करता, त्यांच्यावर ईडीची कारवाई करता तर ही सरळ सरळ नाशिक महानगरपालिकेची लूट आहे. या सर्व प्रकरणाचे लाभार्थी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या नगर विकास खात्यातील अधिकारी आहेत, त्यांचे बिल्डर आहेत.

याबाबत चौकशी मुख्यमंत्री करणार नाही तर पण भ्रष्टाचाराची उच्चाटन करण्याची घोषणा प्रधानमंत्री यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे ते खोटं आहे. या प्रकरणाची चौकशी व्हावी, एसआयटी स्थापन करावी या प्रकरणाची ईडीने चौकशी करावी, या अपहाराबद्दल गुन्हे दाखल व्हावेत. जर असं नाही झालं तर जेव्हा आमचं सरकार बदलेल तेव्हा या ८०० कोटी घोटाळ्यातील सर्व लाभार्थ्यांना मनी लाँडरिंग प्रकरणात आम्ही तुरुंगात पाठवल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे.

# मोदींच्या डोक्यावर शिवरायांसारखा जिरेटोप

त्यांना तेथील सिंहासनावर बसवणार का? असेही म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एलजेपी (आर) प्रमुख चिराग पासवान, आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि आरएलडी प्रमुख जयंत चौधरी पंतप्रधानांच्या नामांकनाला उपस्थित होते. साऊथचा सुपरस्टार पवन कल्याणही वाराणसीला पोहोचला होता. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ज्येष्ठ नेते प्रपुल्ल पटेल हे देखील उपस्थित होते.

# पवार साहेबांनी सुप्रिया सुळे सोडून...

एका वृत्तवाहीनीने घेतलेल्या माझा व्हिजन, माझा महाराष्ट्र या कार्यक्रमात ते बोलत होते.

जयंत पाटील म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत मतदारांमध्ये कोणताही गोंधळ नाही. भारतातली महागाई वाढली आहे. तपास यंत्रणांचा गैरवापर सुरु आहे. लोकांनी आता पक्क ठरवलंय की दिल्लीचे सरकार पडायचेच आहे, असे त्यांनी म्हटले.

तपास यंत्रणांचा गैरवापर सुरु आहे. तुम्हाला भीती नाही वाटली का? तुम्हाला समोर जावेस वाटले नाही का? अशी विचारणा केली असता जयंत पाटील म्हणाले की, मलाही ऑफर देण्याचा प्रयत्न झाला होता. तो पर्यंत एकदा झाला. पूर्ण दिवस मी तिथे जाऊन आले. भीती वाटो अगर न वाटो, पक्ष बदलण्याइतकी काही मोठी भीती नाही. जे त्या पक्षात गेले त्यांना जास्त भीती दाखवली गेली का? यावर जयंत पाटील म्हणाले की, मला माहिती नाही. कदाचित असण्याचा संभव आहे. मोदी साहेबांची घोषणा एकदा झाली आणि ७०००० कोटींचा आकडा त्यांनी सांगितल्यावर सगळेच गेले. त्यामुळे परिणाम झालेला दिसतोच आहे.